# उच्च न्यायालय, मुंबई

मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखा आस्थापनेवर "**सफाई कामगार**" या पदाची रिक्त असणाऱ्या **०२** पदाकरितांची निवड यादी तयार करण्यासाठी निरोगी, इच्छुक व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागिवण्यात येत आहे. सदर निवड यादी ही प्रसिध्दीच्या दिनांकापासून फक्त २ वर्षांसाठीच वैध राहील. ७ व्या वेतन आयोगानुसार सदर पदाचे वेतन मॅट्रिक्स एस-१ रु. १५०००-४७६००/- व भत्ते अशी आहे.

सदर प्रक्रिये दरम्यान घेतल्या जाणाऱ्या चाचणीसाठी / मुलाखतीसाठी उमेदवारास स्वखर्चाने हजर रहावे लागेल. नियुक्ती व अल्पसुचीचे (shortlisting) सर्व अधिकार प्रशासन, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

**अ) पात्रता :-**

१) उमेदवार किमान सातवी इयत्ता उत्तीर्ण असावा.

२) उमेदवाराला शौचालय व स्नानगृह स्वछतेचा, झाडू कामाचा तसेच कार्यालय परिसर स्वछतेचा पुरेसा अनुभव असावा.

३) उमेदवारास मराठी व हिंदी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

४) जाहिरात प्रसिद्धीच्या तारखेस खुल्या प्रवर्गातील उमेदवाराचे वय किमान २१ वर्ष व कमाल ३८ वर्ष असावे. मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्ष राहील. न्यायालयीन कर्मचारी किंवा शासकीय कर्मचारी यांना कमाल वयाची अट नाही.

**ब) पात्र उमेदवारीकरिता अटी :-**

१) तो / ती करार करणेस सक्षम असावा / असावी.

२) त्याला / तिला नैतिक पतनाच्या गुन्ह्यासाठी दोषी ठरवण्यात आले नसावे किंवा त्याला / तिला कोणत्याही न्यायालय / एम. पी. एस. सी. / यु. पी. एस. सी. किंवा कोणत्याही राज्य सेवा आयोगाने त्यांच्याद्वारे आयोजित केलेल्या परीक्षा निवडींमध्ये उपस्थित राहण्यापासून कायमचे काढून टाकले नसावे किंवा अपात्र ठरवले नसावे.

३) त्याला / तिला फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवले नसावे किंवा त्याच्या / तिच्या विरुद्ध फौजदारी खटला प्रलंबित नसावा.

४) त्याने / तिने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे त्याच्या / तिच्या उमेदवारीसाठी निवड समिती किंवा तिच्या सदस्यांवर कोणत्याही प्रकारे दबाव टाकण्याचा प्रयत्न केलेला नसावा.

५) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ नुसार, उमेदवारास अर्ज करण्याच्या दिनांकास, २८ मार्च २००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे, हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक नसावी.

## : उमेदवारांकरीता इतर आवश्यक सूचना :

- सदरहु पदे जशी जशी रिक्त होतील त्यानुसार नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांनी पदस्थापनेबाबत / स्थळाबाबत कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा पदस्थापनेबाबत विनंती केल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

- भरती रद्द झाल्यास याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे, याबाबत सर्व अधिकार प्रशासन, उच्च न्यायालय, मुंबई, यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

- निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी अर्जदाराने अर्जात दिलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

- अर्जदार जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पात्रता व अटी शर्तीनुसार पात्र आहे असे समजून त्याला प्रात्यक्षिक परीक्षेकरिता तात्पुरता प्रवेश देण्यात येईल. मुलाखती / नियुक्ती पूर्वी उमेदवाराची जाहिरातीनुसार पात्रता तपासण्यात येईल. त्यावेळी उमेदवार अपात्र आढळल्यास नियुक्ती करण्यात येणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

- जाहिरातीस अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या, उमेदवाराची शैक्षणिक पात्रता व त्यातील गुणवत्ता तसेच शौचालय व स्नानगृह स्वछतेचा, झाडू कामाचा व कार्यालय परिसर स्वछतेचा पुरेसा अनुभवानुसार अल्पसुची करण्याचे सर्व अधिकार प्रशासन, उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

- केवळ अर्ज दाखल केला यावरून मुलाखतीचा किंवा नेमणूकीचा हक्क मागता येणार नाही. तसेच उमेदवाराची उच्च शैक्षणिक पात्रता हा सदर पदाच्या निवडीसाठी मुख्य आधार मानला जाणार नाही.

- आलेल्या अर्जाची छाननी केल्यानंतर अल्प सूची प्रमाणे पात्र उमेदवारांना खालील निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

| अ. क्र. | मूल्यांकन पद्धती | गुण |
|---|---|---|
| १ | प्रात्यक्षिक परीक्षा<br>**(किमान पात्रता गुण १५)** | ३० |
| २ | शारीरिक क्षमता चाचणी | १० |
| ३ | वैयक्तिक मुलाखत | १० |
| **४** | **निवड प्रक्रियेचे एकूण गुण** | **५०** |

**सूचना:** उमेदवार प्रात्यक्षिक चाचणीत अनुत्तीर्ण झाल्यास त्याचा उर्वरित चाचणीसाठी विचार केला जाणार नाही.

- प्रात्यक्षिक परीक्षा तसेच मुलाखतीसाठी बोलावण्यात येणाऱ्या उमेदवारांनी त्यांनी अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रति पडताळणीसाठी आणाव्यात. तसेच या कार्यालयास मान्य होईल असे स्वतःचे फोटो प्रमाणपत्र (Photo ID) उदा. मतदार कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड, वाहन परवाना यापैकी कोणताही एक पुरावा आणावा.

- कार्यालयाच्या नियंत्रणाबाहेरील कोणत्याही अनपेक्षित घटनेमुळे भरती प्रक्रियेचे वेळापत्रक बदलू शकते असा बदल वेळोवेळी उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केला जाईल.

- उमेदवाराला कोणत्याही बदलाबाबतची सूचना उशीरा मिळाल्यामुळे नियोजित तारखेस व वेळेस प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक चाचणी व मुलाखतीस उमेदवार अनुपस्थित राहिल्यास, उच्च न्यायालय प्रशासनाकडून या बाबत कोणतीही तक्रार / दावा विचारात घेतला जाणार नाही किंवा ऐकला जाणार नाही.

- उमेदवाराने सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातच अर्ज सादर करावा. सदर अर्जातील माहिती स्पष्ट हस्ताक्षरात लिहावी आणि त्यावर अलीकडील पासपोर्ट आकाराचा फोटो लावून त्यावर स्वाक्षरी आवश्यक आहे. अर्ज अपूर्ण भरलेला असॅल / वाचता येण्याजोगा नसेल / विहित नमुन्यात नसेल / फोटोशिवाय असेल किंवा त्यावर स्वाक्षरी नसेल तर असा अपूर्ण अर्ज नाकारण्यात येईल आणि त्याबाबत कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.

- उमेदवाराने दिलेला कोणताही तपशील खोटा किंवा चुकीचा असल्याचे आढळल्यास, उमेदवाराला निवड प्रक्रियेत भाग घेण्याची परवानगी दिली जाणार नाही आणि नियुक्त झाल्यास त्याला काढून टाकण्यात येईल. कोणतीही वस्तुस्थिती दडपल्यास अर्ज नाकारला जाईल.

- निवड यादीतील उमेदवार नियुक्ती आदेशात नमूद केलेल्या कालावधीत सेवेत रुजू होऊ शकला नाही तर त्याचे नाव निवड यादीतून काढून टाकले जाईल.

- निवड यादीतील उमेदवारांची नियुक्ती सुरुवातीला दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल. परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक पूर्ण झाल्याबद्दल प्रमाणपत्र जारी होईपर्यंत नियुक्तीच्या सेवा कोणत्याही वेळी, कोणतीही नोटीस न देता किंवा कोणतेही कारण न देता समाप्त केल्या जातील.

- उमेदवारांची निवड ही प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक चाचणी व मुलाखतीत मिळालेल्या गुणांच्या आधारे केली जाईल.

- या निवड प्रक्रियेत निवड समितीने घेतलेला निर्णय हा अंतिम असेल.

**'<u>सफाई कामगार</u>'** पदाची कर्तव्ये **'परिशिष्ट अ'** मध्ये थोडक्यात सांगितली आहेत.

**प्रबंधक, मूळ शाखा**
**उच्च न्यायालय, मुंबई**

**उच्च न्यायालय, मूळ शाखा }**
**मुंबई, ४ ऑक्टोबर २०२२ }**